तू असताना नव्हते उरले इतुके भान
नसताना तू पेटून उठले आता रान
ही सर्वस्वाची होळी
उरे न काही जवळी आश्वासित
त्या आशांची नुरली शान
नसताना तू पेटून उठले आता रान.

आधाराला होते जेव्हा अळवाचे हे पान
कर्तव्ये सांभाळित होते थेंबांचे जणु प्राण
त्या क्षणीच ते तुटले बंधन
स्नेहाचे हटले घटले ताण मनांचे पण नाही
उरले त्राण नसताना तू पेटून उठले आता रान.